# " दारु बाजास इशारा "

चाल :– ( धन्य शिवाजी )

अनंत लाभासाठीं देखिल दारू नको सेऊं ।
ऐक ऐक हे बोल फुकाचे किर्ती नको मिळवूं ।।धृ।।
सुखद यैत्रनी जराधीन तूं नको नको होऊं ।
दारू पिवुनी यमराजाच्या सदनी नको जाऊं ।।
दुर्व्यसनाच्या नादीं लागुनी देह नको जाळुं ।
बंधूराया सुदृढ काया व्यर्थ नको दवडूं ।।

हे मद्यपान मनुजारी
सेविल जो होई भिकारी
धिका:रिति जन त्या भारी

उधळुनी पैका हाती बाल्का झोळी नको देऊं ।
राख रांगोळी संसाराची करुनि नको घेऊं ।।१।।
दिली प्रभुनें मनुष्ययोनी भज त्या श्रीहरीला ।
देशापायीं मरणे जगणे धर्मची हा पहिला ।।

२८



तुझे व्यसन हें पाप भयंकर रुचेन ईशाला ।
स्वर्गामाजी हळहळण्याऱ्या तुझ्याच पितराला ॥
मद्यसागरीं बुडवूं नको तूं आपल्या देहाला ।
अमुल्य काया जाईल वाया भुलुनी मोहाला ॥
नरकामध्यें बुडवूं नको तूं आपल्या वंशाला ।
महाभाग तूं जागजागरे आपुल्या किर्तीला ॥
सर्वस्वासह स्व-प्राणाला प्राशुनी दारूला ।
सांग सांग का? हाक मारिशी स्वयेंच मृत्यूला ॥
हे व्यसन असे असुरांचें
नरमांस भक्षिती त्यांचे
पुतळेच जणु पापांचें
शाहिरहा प्रल्हाद विनंवितो दारू बाजाला ।
देश बंधुहो सोडासोडा ऐशा व्यसनाला ॥२॥